महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

गुरुवार ■ २९ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२



# महाराष्ट्राच्या लाडक्या 'दादाला' अखेरचा निरोप

## महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दु:खद निधन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २८**

**मुंबई :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांचे आज (२८ जानेवारी) सकाळी बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात दुःखद निधन झाले आहे. अपघाताच्या वेळी विमानात पवारांसह एकूण पाच व्यक्ती सवार होते, ज्यांचा सर्वांचा मृत्यू झाला. ही घटना मुंबईहून बारामतीकडे जाताना लँडिंगच्या वेळी घडली.

अपघाताची घटना बारामती विमानतळाजवळ झाली. चार्टर्ड Learjet ४५XR (VT-SSK) विमान लँड होताना अपघातग्रस्त झाले आणि विमान जळून राख झाले. अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवारांसह चार प्रवासी आणि क्रू मेंबरांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी अपघातानंतर महाराष्ट्र सरकारने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. केंद्रीय व राज्यस्तरीय नेत्यांनी दुःख व्यक्त केले असून, पीएम मोदी, केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संवेदना व्यक्त केल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अपघाताच्या कारणांवर कोणताही राजकीय स्पष्टीकरण न देता सर्वांनी संयम बाळगावा, असे आवाहन केले.

अजित पवार यांचे पार्थिव काल (२८ जानेवारी) सायंकाळपासून विद्याप्रतिष्ठान, विद्यानगरी चौक, बारामती येथे नागरिकांसाठी ठेवण्यात आले. आज दि. (२९ जानेवारी) सकाळी ९ वाजता गदिमा सभागृहापासून अंत्ययात्रा सुरु होईल. पार्थिवावर शासकीय इतमामात सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत. या अपघातामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणि प्रशासनावर मोठा धक्का बसला आहे. राज्यभर शोककळा पसरली असून, नागरिकांनी या दुर्दैवी घटनेला भावभीनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.



### संपादकीय

## असे अजित दादा पुन्हा: होणे नाही!

**रवींद्र घोडविंदे**

अजित दादा पवार महाराष्ट्र राज्यातील एक उमदा नेतृत्व, “बोलें तैसा चाले” या उक्ती नुसार आचरण करणारे, “माझ्या पेक्षा माझं काम बोलतंय” हे कृतीतून सिद्ध करणारे दादा, सर्वाधिक उपमुख्यमंत्री म्हणून पद भूषवणारे राज्यातील ते एकमेव व्यक्तिमत्व होते. पद किती काळ आहे, यापेक्षा असणाऱ्या पदाचा कामातून सामान्य माणसाच्या हिताला आणि राज्याच्या प्रगतीला दिशा कशी मिळेल, यासाठी धडपडणारे अजित दादा स्पष्ट वक्ते होते. “बोललो म्हणजे करून दाखवणारच” हे सांगणारे दादा, वेळेचा अपव्यय न करता वेळेला महत्व देणारे होते. सामान्य माणूस हाच विकासाचा धागा मानून राज्याच्या प्रगतीला नवी दिशा देण्यासाठी नवनवीन उपक्रम आणि कृतिशील प्रकल्प राबवणारे दादा, हे राज्य व देशाच्या सर्व क्षेत्रात कसे पुढे जाईल यासाठी धडपडणारे होते. ग्रामीण, शहरी परिसरा सह येथील तळागाळातील सामान्य माणूस प्रगतीच्या वाटेने विकास प्रवाहात यावा, यासाठी कल्याणकारी योजना राबवणारे दादा होते. येथील शेतकरी, कष्टकरी, कामगार, शेतमजूर यांच्या भल्यासाठी आणि कल्याणासाठी राजकीय, सामाजिक जीवनात वसा घेऊन दिवस-रात्र काम करणारे दादा होते.

बोललो तर पश्छाताप कशासाठी? समाजाचं भलं व्हावं म्हणून सामाजिक समस्या प्रश्नांवर रोखठोक विचार व्यक्त करणारे दादा, स्वतःचा राजकीय प्रवास एक संघर्ष मानून या संघर्षाला संयमाने सामोरे जाणारे दादा, राज्याच्या सामाजिक जीवनाची जाण आणि भान असलेले, अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणजे अजित दादा होते. टिकाकारांना तितक्याच शांत स्वभावात प्रतिउत्तर न देता, स्मित हास्य करून स्व:टीका सहन करणारे अजित दादा, राज्याच्या अर्थसंकल्प मांडताना राज्यातील मागास, दुर्गम, अति दुर्गम भागाला न्याय देत शहरी भागालाही आधार देऊन राज्य विकासाचा रथ प्रगतीकडे नेण्यासाठी प्रयत्न करणारे होते. आज आपल्यात नाहीत, हेच चूक चुकल्या सारखं वाटतंय. दादाची ही आकस्मिक एक्झिट राज्याच्या विकासाला नक्कीच मारक ठरणारी आहे. एखादं नेतृत्व तयार होण्यासाठी अनेक वर्ष खर्च होतात; मात्र अशी तयार होणारी नेतृत्व आकस्मिक जाणे दुर्दैवी घटना आहे. दादा गेले, राज्य एका अभ्यासू, कामसू नेतृत्वाला मुकले आहे. असे दादा आत्ता तरी होणे नाही.

दादांना अनेक वेळा भेटण्याचा योग आला; त्यांची भेट म्हणजे सकारात्मक विचारांची शिदोरी असे. “सामान्य माणसाची कामे करा, योजना राबवा, स्वतःची ओळख तयार करा” असा त्यांचा सल्ला असे. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# दादांवर आज अंत्यसंस्कार !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २८**

बारामतीमध्ये झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. बारामती येथील विमान अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. अजित पवार यांच्यासह त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव, फ्लाईट असिस्टंट पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणिकॅप्टन शांभवी पाठक अपघातात मृत्यूमुखी पडले. महाराष्ट्र सामान्य प्रशासन विभाग (प्रोटोकॉल) नुसार, उद्या गुरुवारी (29 जानेवारी) सकाळी 11 वाजता पूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील. राज्यात तीन दिवस राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. बारामतीमध्ये लँडिंग होण्यापूर्वीच अजित पवार यांचे विमान कोसळले. अजित पवार आज (28 जानेवारी) बारामतीमध्ये तीन जाहीर सभांना उपस्थित राहणार होते.

**■ अजित पवारांचे पार्थिव कुठं आणि कस ठेवणार?**

दरम्यान, अजित पवार यांचे पार्थिव बारामती वैद्यकीय महाविद्यालयात ठेवण्यात आले होते. तिथं अभूतपूर्व गर्दी झाली होती. त्यानंतर दुपारी तीनच्या सुमारास पवार यांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानमध्ये आणण्यात आलं होतं

आज रात्री 10 वाजेपर्यंत विद्या प्रतिष्ठानमध्ये अंत्यदर्शन घेता येईल. उद्या सकाळी 6 ते 9 त्यांच्या मुळगावी काटेवाडी इथं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी अकरा वाजता विद्या प्रतिष्ठानमध्ये अंत्यसंस्कार होणार आहेत. अंतिम दर्शनासाठी राज्यातील नेते या ठिकाणी आलेत तसंच जय पवार आणि श्रीनिवास पवार याठिकाणी आले आहेत. अजित पवार यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात रात्री 8 ते रात्री 10 वाजेपर्यंत ठेवण्यात येत आहे. त्यानंतर आज गुरुवारी सकाळी 6 ते सकाळी 9 वाजेपर्यंत पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येईल. सकाळी 11 वाजता त्यांच्या पार्थिवावर शासकिय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील. मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, राज ठाकरे, उद्धव ठाकरे बारामतीत दाखल झाले आहेत. उद्या पंतप्रधानदेखील उपस्थित राहणार आहेत.

# देवीचापाडा– कोपर खाडी परिसरातील बेकायदा चाळींवर कारवाईचे आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २८**

कल्याण : कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा, कोपर खाडी किनारा परिसरात उभारण्यात आलेल्या बेकायदा चाळींवर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. पर्यावरण संवर्धन तसेच खाडी व कांदळवनांचे संरक्षण लक्षात घेता ही कारवाई करण्यात येणार असल्याचे पालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. देवीचापाडा स्मशानभूमी, द्वार गणपती विसर्जन तलाव, मेंग्या आजो मंदिर, अनमोलनगर परिसर तसेच कोपर म्हाळसाई चाळ परिसरात खाडी बुजवून व कांदळवन क्षेत्रात उभारलेल्या बेकायदा चाळी हटविण्याबाबत आयुक्तांनी अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त समीर भूमकर व ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांना निर्देश दिले आहेत. या कारवाईमुळे पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यास मदत होणार असून परिसरातील नैसर्गिक समतोल राखण्याचा पालिकेचा प्रयत्न असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बेकायदा बांधकामांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पालिकेने गांभीर्याने दखल घेत तातडीने पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून, नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. पालिका प्रशासनाच्या या निर्णयामुळे खाडी किनारा व कांदळवन क्षेत्राचे संरक्षण होऊन शहरातील पर्यावरण संवर्धनाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याने नागरीक त्रस्त टोरंट पावर कंपनीवर कारवाईची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (प्रतिनिधी)**

भिवंडी शहरात गेल्या काही दिवसापासून वीज भारनियमन व वीज पुरवठा दुरुस्ती काम करण्याच्या नावाखाली वारंवार वीज पुरवठा खंडित केला जात असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व संतापाची लाट उसळली आहे.वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने उद्योग व व्यवसायाचे मोठे नुकसान होत आहे. याबाबत वीज पुरवठा करणाऱ्या टोरंट पावर कंपनीकडे तक्रारी करून सुध्दा दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकडे लक्ष द्यावे आणि टोरंट पावर कंपनीवर कारवाई करून कंपनी व्यवस्थापनाला समज द्यावी अशी मागणी खासदार चंद्रकांत हंडोरे यांची भीमशक्ती संघटना व पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.

भिवंडी शहर परिसरात वीज पुरवठा व वीजबिल वसुल करणाऱ्या खाजगी कंपनी असलेल्या टोरेंट पावर कंपनीच्या मनमानी कारभाराला येथील नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे,आमदार रईस शेख यांच्यासह मान्यवर नागरिक व सामाजिक संघटनेच्या माध्यमातून शासनाकडे वारंवार लेखी तक्रार करण्यात आल्या आहेत.असे असताना शहर व ग्रामीण परिसरात वारंवार 5 ते 6 तास भारनियमन व वीज केबल दुरूस्ती नावाखाली वीजपुरवठा खंडित करून वीज ग्राहकांना त्रास देण्याचे काम खाजगी कंपनी असलेल्या

टोरंट कंपनी कडून केले जात आहे. वीज पुरवठा खंडित होत असतानाही अनेक ग्राहकांना मोठ्या प्रमाणात वीजबिल पाठवून त्यांची पिळवणूक केली जात असल्याची तक्रार भीमशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुरेश म्हस्के, एस.मोहम्मद,श्रीपत तांबे यांनी केली आहे.

वीजपुरवठा खंडित होत असल्याने घरगुती नागरिकांना सुरळीतपणे पाणी पुरवठा होत नाही त्यामुळे महिलांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच पावरलुम व्यापार व उद्योगाचेही मोठे नुकसान होत आहे.त्यामुळे दुकानदार व पावरलुम व्यापारी वर्ग त्रस्त झाला आहे अशी माहिती पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख सिध्दीक फक्की यांनी दिली.टोरंट पावर कंपनीच्या गलथान कारभारा बाबतीत शासनाने सुध्दा समज दिली आहे तरीही टोरंट वीज कंपनीकडून भिवंडीतील वीज ग्राहकांना वीजपुरवठा खंडित करून व मोठ्या प्रमाणात वीजबिल पाठवून त्रास दिला जात आहे.वीजपुरवठा खंडित होत असल्याबाबत कंपनी कडे दुरध्वनी वरून संपर्क साधून तक्रार केल्यास समाधानकारक उत्तर दिली जात नाहीत वीजपुरवठा खंडित होण्याबाबतीत त्यांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती नसते त्यामुळे ते समाधानकारक उत्तर न देता पाहतो अशी अनपेक्षित उत्तर देत ग्राहकाची अहवेहना करीत असल्याची माहिती भीमशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुरेश म्हस्के यांनी दिली.

## अंबरनाथ–कुळगाव बदलापूरमध्ये थकबाकीदारांसाठी ‘अभय योजना’ लागू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**अंबरनाथ / दि. २८**

अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद क्षेत्रातील मालमत्ता धारकांना दिलासा देण्यासाठी ‘अभय योजना’ लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत थकबाकीची मूळ रक्कम एकरकमी भरल्यास थकबाकीवरील शास्तीमध्ये ५० टक्के सूट दिली जाणार आहे. गेल्या आठवड्यात कुळगाव बदलापूर नगर परिषदेने या योजनेची घोषणा केली होती, तर मंगळवारी अंबरनाथ नगर परिषदेनेही अधिकृत घोषणा केली.

अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद क्षेत्रात मालमत्ता कराची मोठी थकबाकी जमा झाली असून, ती वसूल करण्यासाठी तसेच नागरिकांना दिलासा देण्यासाठी अभय योजना लागू करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून होत होती. त्यानुसार कुळगाव बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नवनिर्वाचित नगराध्यक्षा रुचिता घोरपडे यांनी या योजनेसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

मंगळवारी अंबरनाथ नगर परिषदेच्या नगराध्यक्षा तेजश्री करंजुळे यांनीही अभय योजनेची घोषणा केली. त्यानुसार अंबरनाथ शहरातील थकबाकीदार मालमत्ताधारकांनी थकबाकीसह मूळ रक्कम एकरकमी भरल्यास शास्तीमध्ये ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा तेजश्री करंजुळे तसेच नगर परिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

नगर परिषद प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ही अभय योजना ३१ मार्चपर्यंत लागू राहणार आहे. त्यामुळे मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या नागरिकांनी या कालावधीत कर भरणा करून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





## कर्तव्यनिष्ठ नेता

**जन्म:** २२ जुलै १९५९,**ठिकाण:** बारामती, पुणे जिल्हा, महाराष्ट्र
**कुटुंब:** पवार कुटुंब – महाराष्ट्रातील प्रभावशाली राजकीय आणि सहकारी क्षेत्रातील कुटुंब,**वडील:** पांडुरंग पवार – स्थानिक नेते
**मामा:** शरद पवार – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (NCP) संस्थापक आणि माजी मुख्यमंत्री,अजित पवार हे बारामती कुटुंबाचे प्रमुख सदस्य म्हणून ओळखले जातात.
**राजकीय सुरुवात** :तरुण वयातच राजकारणात प्रवेश केला. सुरुवातीला स्थानिक सहकारी संस्था, बारामतीतील सामाजिक उपक्रम आणि दुग्ध संघ, साखर युनियन्सशी निगडित कार्य केले. बारामती विधानसभा मतदारसंघातून सात वेळा विजयी ठरले. लहान वयातच लोकप्रिय नेते व प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणून ओळखले गेले.
**व्यक्तिमत्व व लोकांशी संबंध** : सरळसरळ बोलणारे आणि लोकांशी जवळचे नेता,प्रशासनात कर्तव्यनिष्ठ, पण जनतेच्या समस्यांमध्ये सक्रिय सहभाग. सामाजिक आणि राजकीय कार्यात सातत्य ठेवणारे, "दादा" म्हणून ओळखले गेले
**कौटुंबिक जीवन** : पत्नी आणि दोन मुलगे (सामाजिक माध्यमांत काही प्रमाणात परिचित)कुटुंबीय सार्वजनिक जीवनात सक्रिय नसले तरीही बारामती व महाराष्ट्रातील सहकारी व सामाजिक उपक्रमांमध्ये मदत करीत राहिलेजनतेच्या अपेक्षा समजून घेणे व समाजासाठी काम करणे हा दृष्टिकोन
**सामान्य जनतेबद्दल दृष्टिकोन** : सामान्य माणसांच्या दैनंदिन समस्या समजून घेणे. स्थानिक प्रकल्प, शिक्षण, कृषी, जलसंपदा, आणि रस्ते योजनेत लोकांचा सहभाग समाजातील सामान्य व्यक्तींसाठी प्रेरक नेते – सर्वसामान्य लोकांशी जवळीक राखणे






# दादा गेले?

दादा गेले. ते विमान अपघातानं गेले. मी व्हाट्सअपवर बातमी वाचली. तेव्हा क्षणभर विचारच केला नाही की दादा गेले असतील.तसा टिव्ही लावला व टिव्हीवर बातमी ऐकली दादा गेल्याची. तेव्हा दादा खरंच गेले आहेत याची पुष्टी झाली.

दादा एक मिस्किल व दयाळूभाव असणारे व्यक्तीमत्व. ते असे जातील, असं कधीच वाटलं नव्हतं. परंतु घटनाच ती. जी घटना नशीबात लिहून असते. ती होणारच. जी दादांबद्दल झाली. दादा काळाच्या पडद्याआड गेले.

दादा गेल्यानंतर दादांच्या जाण्याबद्दल कुणाचाच सहजासहजी विश्वासच बसला नसेलच. कारण दादांचं व्यक्तीमत्व असंच होतं फुलणारं. ते वक्तव्यही असेच करायचे की ज्यातून विरंगुळाच होईल व हशा पिकेल. कुणालाही ते असले की कंटाळवाटेपणा वाटणार नाही.

दादांच्या भाषणाबद्दल सांगायचं झाल्यास त्यांच्यात वक्तृत्व कला होती. तिही तेवढीच कलाकुसरीची होती, जेवढा त्यांच्यात दयाळूभाव होता. एवढंच नाही तर कामं करण्याची हातोटी होती. ते कोणतंही काम वेळेत आणि तेवढ्याच काटेकोरपणे करीत असत.

अजितदादा पवार. एक बारामतीतील दादा नाही, तर संपुर्ण महाराष्ट्रातील दादा. त्यामुळंच ज्यांनी कुणी त्यांना अनुभवलं ते दुःखी झाले. अन् दुःख होणारच. कारण जो चांगला व्यक्ती असतो. त्याच्या जाण्यानं दुःख वाटणारच. तेच दुःख दादांबद्दलही लोकांना वाटलं.

'दादा' दादा नावाचं एक विशेषण आहे. ते दादा विशेषण सर्वांनाच लागू होत नाही. पहिलं एक दादा विशेषण त्याला लागू होतं. जो गुंड किंवा बदमाश असेल आणि दुसरं विशेषण त्याला लागू होतं, जो इतरांची मदत करीत असेल. अजीत पवार हे दुसऱ्या गटातील. इतरांना मदत करणारे. जो व्यक्ती त्यांच्याकडे एखादी समस्या घेवून गेला की समजलं जायचं, त्याचं काम होणारच आणि ते काम होतच असे. याच त्यांच्या स्वभावानं ते वाढत गेले व सर्वांचे दादा बनले. त्यातच त्यांनी कधी हार पाहिली नाही.

अजीत पवारांचं नाव अजीत. अजीत याचा अर्थ ज्याला जिंकूच शकत नाही, असा होतो. तसे कामाला प्रथम प्राधान्य देणारे दादा म्हणजे विचारी व्यक्तीमत्व. कामाचा विचार करीत असतांना ते विचार करेयचे की सत्तेत राहिल्याशिवाय कामे होणार नाही. म्हणूनच ते सत्ता मिळविण्यासाठी उलटफेर करायचे. कारण सत्ता असेल तर सर्वकाही साध्य करता येईल, असं त्यांना वाटायचं आणि ते करुन दाखवायचेही. त्यातच सत्तेमध्ये असतांना ते त्यांचे काका शरद पवारांचे आधारस्तंभ बनले होते. परंतु सत्ता असल्यानंतरच आपलं काम जोमानं करता येतं, या त्यांच्या विचारानं ते भाजप व शिंदे गोटात गेले. परंतु असं जरी असलं तरी अलिकडील काळात जी महानगरपालिकेची निवडणूक झाली. त्यात ते आपलेच काका शरद पवारांच्या बाजूने उभे राहिले व आपला रथ हाकला. दुर्दैव एवढंच की त्यात भाजपाची लहर असल्यानं त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. याचा अर्थ असा नाही की त्यांनी कामं केली नसावीत.

अजीत पवार एक दुर्मिळ व्यक्तीमत्व. आता कोणी म्हणतात की सत्तेसाठी त्यांनी आपल्या काकालाही सोडलं की ज्यांनी त्यांना वर आणलं. कोणी म्हणतात की त्यांनी सिंचन घोटाळा केला होता आणि ईडी मागे लागली होती, म्हणून ते शिंदे व भाजप गटात गेले. परंतु ते कारण नसून केवळ लोकांची कामं व्हावीत यासाठी ते भाजप, शिंदे गटात गेले व त्यांनी केवळ त्यांच्या गटात जावून चूप राहण्याचं काम केलं नाही तर त्यांनी हिरीरीनं जनतेची कामं केलीत. ज्यातून लाडली बहिण योजना राबवली गेली. जी योजना अजुनही सुरुच आहे.

ते सर्वांचेच दादा बनले. आपल्या कर्तृत्वानं आणि कर्तव्यानं. ते बोलायचे. जे बोलायचे. ते खरे करुन दाखवायचे. त्यांच्या बोलण्यानं विरंगुळाच व्हायचा. त्यांचं भाषणही कंटाळवाणं व्हायचं नाही. अशा या महान व्यक्तीमत्वाचं अचानक जाणं म्हणजे सर्वांनाच हळहळ वाटणारी गोष्ट. साहजिकच हळहळट वाटत असेल कुणालाही. अशा या महान राजनेत्याला नव्हे तर दादाला शतशः प्रणाम व भावपूर्ण श्रद्धांजली. दादा गेल्यानंतरही सर्वांच्या ह्रदयात दादा म्हणून जीवंत असतील यात शंका नाही.

- **अंकुश शिंगाडे नागपूर ९३७३३५९४५०**



## आमदार निरंजन डावखरे यांनी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली...

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाची वार्ता अत्यंत सुन्न करणारी आहे. प्रशासनावरील पकड आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास असलेले एक धडाडीचे नेतृत्व आज आपल्यातून हरपले आहे. सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवण्याचा विक्रम प्रस्थापित करणाऱ्या दादांनी सिंचन, ऊर्जा आणि वित्त अशा महत्त्वाच्या विभागांतून महाराष्ट्राच्या प्रगतीला नवी दिशा दिली. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील एक 'शिस्तबद्ध आणि कार्यतत्पर' अध्याय संपला आहे. ही पोकळी कधीही भरून निघणारी नाही.त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! या कठीण काळात पवार कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहोत.



**- आमदार निरंजन डावखरे**



## आमदार किसन कथोरे यांनी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली...

भल्या पहाटे कामाला लागणारा, अफाट कार्यक्षमता, प्रशासनावर जबरदस्त पकड आणि अधिकाऱ्यांवर धाक असलेला निडर नेता काळाच्या पडद्याआड गेला, माळशेज घाटात काचेचा स्काय ऑक उभारणीत महत्वाची भूमिका घेणारे. माझ्या राजकीय जीवनातील आदर्शवत नेतृत्व मार्गदर्शक अजित दादाची आकस्मित एक्झिट राज्यासाठी व माझ्यासाठी वैयक्तिकरित्या अपरिमित हानी आहे.दादांचे नेतृत्व, निर्णयक्षमता आणि जनतेप्रती असलेली निष्ठा कायम स्मरणात राहील. त्यांच्या कार्याचा ठसा महाराष्ट्राच्या इतिहासात अढळ राहील.
दादाना भावपूर्ण श्रद्धांजली !



**- आमदार किसन कथोरे.**

## आजचा दिवस जगा

मृत्यू हे जीवनाचं अंतिम आणि अटल सत्य आहे. तो कुणाला कधी, कुठे आणि कसा भेटेल याचा काहीही नेम नाही. सकाळी हसत घराबाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी परत येईलच याची खात्री नसते. तरीही आपण हे सत्य विसरून रोजच्या धावपळीत, ताणतणावात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत राहतो. उद्याची चिंता, भविष्याची भीती आणि "अजून मिळवायचं आहे" या विचारात आजचा क्षण निसटून जातो.आजूबाजूला घडणाऱ्या दुःखद घटना आपल्याला क्षणभर थांबवतात. मन सुन्न होतं, डोळे पाणावतात आणि आयुष्य किती नाजूक आहे याची जाणीव होते. त्या वेळी लक्षात येतं की पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता या सगळ्या गोष्टी तिथेच थांबतात. माणसासोबत जातं ते फक्त त्याने कमावलेलं प्रेम, केलेली माणुसकी आणि लोकांच्या मनात उरलेली आठवण. म्हणूनच नात्यांकडे दुर्लक्ष करू नका. आई-वडिलांशी बोला, मित्रांशी मन मोकळं बोला. मनात राग, मत्सर, अहंकार साठवू नका. माफ करणं शिका, कारण वेळ कोणासाठीही थांबत नाही. भौतिक सुख क्षणिक आहेत—सगळी मोहमाया आहे; पण समाधान, प्रेम आणि शांतता हीच खरी कमाई आहे.उद्या काय होईल माहित नाही, पण आज आपल्या हातात आहे.

म्हणून आजचा दिवस जगा, मनापासून जगा, प्रामाणिकपणे जगा. आज अजित दादा पवार यांनी अकाली निरोप घेतला, त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.

आणि जे आज आपल्या सोबत आहेत, त्यांना आपलं प्रेम आजच दाखवा.

# लेखकाचा धर्म आणि वाछितो विजयी होएवा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

दिनांक २४-०१-२०२६ रोजी बांद्रा येईल नॅशनल लायब्रीत भाषापंधरवड्याचे औचित्य साधून विश्वभरारी फाउंडेशन आणि नॅशनल लायब्ररी यांच्या संयुक्तविद्यमाने,पहिले एकदिवसीय साहित्यसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.
संमेलनाचे उद्घाटन साहित्य व सांस्कृतिक मंत्री मा. आशिषजी शेलार यांच्या हस्ते झालं. स्वागताध्यक्ष मा. परागजी अळवणी (आमदार) होते. आणि संमेलनाला जेष्ठ लेखिका, संत साहित्याच्या अभ्यासक रेखाताई नार्वेकर ह्या प्रमुख अतिथी; तर आजचे आघाडीचे कथाकार, कवी, नाटकार किरण येले संमेलनाध्यक्ष म्हणून लाभलेत.
विश्वभरारी फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि संमेलन आयोजक लता गुठे यांनी प्रास्ताविक करताना साहित्य क्षेत्रातील वाचन उदासीनतेबद्दल चिंता व्यक्त केली. यानंतर लता गुठे यांचे काहूरवाटा, रेखा नार्वेकर यांचे स्तुतीसुमने झेले, आणि विद्या थोरात यांच्या मर्मभेद पुस्तकांचे प्रकाशन झाले.

त्यानंतर उदघाटनपर भाषणात मा. आशिषजी शेलार यांनी नॅशनल लायब्ररीचा १०८ वर्षांचा गौरवशाली इतिहास सांगितला. याच वाचनालयात जडणघडण झाल्याचे सांगत आणि रेखा वाल्हेकर आणि लता गुठे यांच्या पुस्तकातील अंशावर तात्काळ केलेलं रसग्रहणात्मक विश्लेषण म्हणजे त्यांची साहित्यिक जाण आणि सांस्कृतिक भान असल्याचे निदर्शक होते. आमदार परागजी अळवणी यांनी भाषणात त्यांना साहित्यिक कार्यमात नेहमी एक वाचक येऊन कवितेच्या ओळी व इतर संदर्भ देऊन त्या पुस्तकाचे लेखक कोण असे विचारत, हा गमतीदार किस्सा कथन केला.
वाचन कमी होत चाललंय हा धागा पकडत संमेलनाध्यक्ष किरण येले यांनी अध्यक्षीय भाषणास सुरुवात करताना सोलापूरजवळील हत्तरकुडलसंग येथील मंदिरातील दगडी तुळईवर हा शिलालेख कोरलेल्या 'वाछितो विजयी होएवा' या लेखाचा उल्लेख केला. आणि अर्थ सांगितला की याचा अर्थ "वाचक विजयी होवो." वाचणारे विजयी का होवोत तर वाचणा-या माणसाना समाजाचा अभ्यास असतो तळागाळातील लोकांप्रती ते संवेदनशील असतात. असे वाचक जर



विजयी होऊन राज्यकर्ते झाले तर ते राज्य निश्चितच सुखी असेल. श न वाचणारे अशिक्षित असूनही निवडून आलेल्या नेत्यांवर आणि त्यांना मतदान करणा-या मतदारांवर ही आडमार्गाने केलेली टिपणी होती हे काहींच्या लक्षात आलं. पुढे वाचक वाढवण्यासाठी उपाय सांगताना किरण येले यांनी दुर्बलांना बाजूने लिहिणं हाच लेखकाचा धर्म असल्याचे सांगताच उपस्थितांनी टाळ्या वाजवून त्यांना अनुमोदन दिलं. इतिहासापेक्षा साहित्य अधिक महत्त्वपूर्ण आहे हे अरिस्टॉटल यांच्या विधानाचा आधार घेत ते म्हणाले की लेखक वर्तमानात जे लिहितो त्याचा पुढे इतिहास होतो. म्हणून आजचा काळ, या काळाचे ताणेबाणे लेखकानं निडरपणे लिहिणं हा लेखकाचा धर्म आहे. समारोप करताना सांस्कृतिक मंत्री आशिष.शेलार यांच्यापुढे त्यांनी तीन प्रस्ताव मांडले.

1. मराठी साहित्यिकांचे माहितीपट नसल्यानं पुढील पीढीसाठी दिवंगत साहित्यिकांवर माहितीपट निर्माण व्हावेत.
2. मराठी साहित्य पाश्चात्य साहित्याइतकंच तोलामोलाचे आहे पण ते इंग्रजीत अनुवादित होत नसल्यानं जीएस, भाऊ पाध्ये, ढसाळ आणि अनेक इतर भाषेत पोहोचवण्यासाठी त्यांचे साहित्य इंग्रजीत अनुवादित अनुवादित करण्यासाठी प्रयत्न व्हावेत
3. अनेक मराठी निर्माते चित्रपट निर्मितीसाठी अनुदान घेतात. सरकार अनुदान देतं म्हणजे जनतेचे पैसे देते. यासाठी की जनतेला चांगली कलाकृती पाहायला मिळावी. पण जनतेच्या पैशावर निर्मिती करणारे काही मोठे निर्माते असे चित्रपट फक्त फिल्म पुरस्काराला पाठवतात. याचा विचार.व्हावा

उपस्थितांनी यालाही टाळ्यांनी अनुमोदन देताच सांस्कृतिक मंत्र्यांनी लागलीच हे मुद्दे लिहून मागवले.
उत्तरोत्तर संमेलनातील पुढील सत्रे रंगत गेली. मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा अनुषंगाने आयोजित परिसंवादात डॉ सुनील रामटेके यांनी मराठीतील बोली भाषा महत्वाच्या असून त्याचे सर्वांगाने संवर्धन अर्थात त्यांचे व्याकरण, शब्दकोश तयार केले तरच मराठी भाषा टिकेल आणि वाढेल असे सांगितले. पंकज पडळ यांच्या समूहाने काव्य-नृत्य अविष्कार करून उपस्थित्यांचे लक्ष वेधून घेतले. डॉ सुनीता बोर्डे यांनी बरगुंडा हे भारुड सादर केलेत.
एकनाथ आव्हाड, भास्कर बडे आणि मेघना साने यांचे कथाकथन छान झाले! तिघांनीही विनोदी कथा सादर केल्या.
यानंतर कवी किरण येले यांच्या 'बाई बाई गोष्ट सांग' कवितासंग्रहावर आधारित संहिताअभिवाचनाचा अभिनव प्रयोग मी आणि सोनाली अहिरेने सादर केला. हा प्रयोग उपस्थिताना अंतर्मुख करणारा ठरला. सुरुवातीस आपसात गप्पा करणारे रसिक काही मिनिटानंतर स्तब्ध झाले. फक्त हुंकार आणि चुकचुकण्याचे आवाज आणि शेवटी टाळ्यांचा कडकडाट. हा आमचा पहिलाच प्रयोग होता. अनेकांनी स्वत: भेटून भन्नाट प्रततिक्रीया दिल्या. काहींनी सूचनाही दिल्या. काहींनी प्रयोग करण्याची तयारी दाखवली.
मध्यवर्ती संमेलन असो वा एकदिवसीय संमेलन गझलरंग, काव्यरंग हे नवोदित आणि प्रस्थापितांचे जिव्हाळ्याचे कार्यक्रम असतात. गझलरंग, आणि काव्यरंग बहारदार झालीत झालीत. जाणकार तसेच नवोदित साहित्यिकांकडून सर्जनशीलतेचा सुंदर अविष्कार अनुभवयास मिळाला. हे ह्या संमेलनाचे यश म्हणावे लागेल.
सगळ्याच सत्रातील सूत्रसंचालन छान झाले. उदघाटन सत्राचे सुंदर सूत्रसंचालन स्मिता आपटे यांनी केले. तर चारूलता काळे यांनी गझलरंगचे सूत्रसंचालन करून गझरलेचे रंग आणखी गहिरे केलेत. समारोपाच्या काव्यरंग सत्रात वृषाली विनायकच्या सूत्रसंचालनाने बहार आणली. अर्थात ह्या सत्रातील सर्वच कविनीं दर्जेदार कविता सादर केल्या. मात्र कवीसंमेलनाचे अध्यक्ष अजय कांडर यानी फक्त कविता मोरवणकर आणि कविता राजपूत यांच्या कविता चांगल्या होत्या अशा कानपिचक्या दिल्या.
खरंतर मध्यवर्ती साहित्य संमेलना इतकीच छोटयामोठ्या इतर संमेलनांचीही नितांत आवश्यकता आहे. स्थानिक किंवा सामूहिक साहित्यिकांसाठी अशी वेगवेगळी संमेलने असायला हवीत. रसिकतेची साधना, जोपासना अशा साहित्य संमेलनातून केली जाते. आणि त्यातून मिळालेला आनंद हा काही औरचं असतो. हा आनंद अनेक प्रकारे, अनेक पातळ्यांवरून मिळत असतो. संमेलनात येणाऱ्या आधीच्या पिढीच्या ज्येष्ठ साहित्यिकांची भेट तसेच नवोदित लेखक आणि रसिकांना घेता येतो. या भेटीचा आनंद मौलिक असतो यात शंका नाही. त्यादृष्टीने हे एकदिवासीय संमेलन यशदायी म्हणावे लागेल. कारण संमेलनाचे आयोजन, नियोजन चोख होते. आयोजक विश्वभरारी फाऊंडेशनच्या डॉ लता गुठे, चारूलता काळे, आणि त्यांच्या इतर सहकारी तसेच नॅशनल लायब्ररीचे श्री प्रमोद महाडिक, प्रदीप राणे यांनी परीश्रम घेतले.

# जिल्हा परिषद कांदळी शाळेतील शिक्षकांचा ग्रामस्थ व ग्रामपंचायतकडून सत्कार !



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : वासिंद जवळील जिल्हा परिषद शाळा कांदळी (ता. भिवंडी) शाळेचे शिक्षक अशोक गायकवाड, शिक्षिका जयश्री मॅडम यांचा प्रजासत्ताक दिन भव्य स्वरूपात विविध कार्यक्रमाद्वारे साजरा केल्याबद्दल तसेच त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच ग्रामपंचायत विभागाकडून सत्कार करण्यात आला.
जिल्हा परिषद शाळा कांदळी येथे 77 वा प्रजासत्ताक दिन कार्यक्रम भव्य स्वरूपात करण्यात आला होता. या निमित्ताने तसेच शिक्षक अशोक गायकवाड व शिक्षिका जयश्री स्पष्टे हे राबवित असलेले विविध उपक्रम यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल घेत ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच नम्रता जाधव, ग्रामपंचायत अधिकारी किशोर गोडसे, ग्रामपंचायत सदस्य अनंता जाधव आदी सदस्य व पदाधिकारी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर या केलेल्या सत्कारामुळे प्रेरणा मिळून यापुढे अजून शैक्षणिक कार्य जोमाने करण्यास बळ मिळाले असल्याचे शिक्षक अशोक गायकवाड यांनी म्हटले आहे.

## भविष्यवेध



गुरुवार
२९ जानेवारी २०२६

**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**
मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल, तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**कर्क**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**सिंह**
महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील. व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**कन्या**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**तुळ**
कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**धनु**
विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल,

**मकर**
कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. अधिका-यांसोबतच्या व्यवहारात थोडे सावध राहावे. कौटुंबिक कामासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो.

**कुंभ**
अशा व्यक्तीला भेटू शकता जो भविष्यात खूप फायदे देऊ शकेल. वेळ वाया न घालवता आणि रखडलेली कामे पुन्हा सुरू केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

**मीन**
जोडीदारासोबत कुठेतरी फिरण्याची योजना बनू शकते. लोकांना त्यांच्या मेहनतीचे सकारात्मक परिणाम मिळतील, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

# वेहळोली गावातील तरुणांनी दिले भेकराला जीवदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भातसानगर** : वेहळोली येथे जंगलातील विहिरीत पडलेल्या भेकराला (हरणाला) सोमवारी गावातील दोन युवकांनी जीवदान दिले.
प्रीतम सतीश भोईर आणि मनीष अनंता भोईर हे शेतावर जाताना जंगलातील एका विहिरीत भेकर (हरण) पडल्याचे त्यांना दिसले. विहिरीत तळाला पाणी असल्याने रात्री पडलेले भेकर थरथर कापत असताना घाबरलेल्या अवस्थेत त्यांना दिसले.
क्षणाचाही विलंब न करताच दोन्ही तरुण त्या भेकराला वाचवण्यासाठी खोल विहिरीत उतरले. या दोघांनी कसेबसे त्याला विहिरीच्या बाहेर काढले. त्याचे अंग पुसले काही क्षणातच ते जंगलात धूम पळाले. दरम्यान, येथील जंगल भागात विविध प्राण्यांचा वावर असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले.



# अजित पवार यांच्या निधनाने कल्याणातही शोककळा

## मोहने बाजारपेठ बंद ठेवत वाहिली श्रद्धांजली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटना अपघात प्रकरणी कल्याणात अजित पवार गट राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शोककूल होत हळहळ व्यक्त केली. कल्याण शहारात, छत्रपती शिवाजी महाराज, सहाजानंद चौक, राष्ट्रवादी पक्ष मध्यवर्ती कार्यालय कल्याण, कल्याण पूर्व पश्चिम परिसरात आपल्या लाडक्या नेत्याला बॅनर लावून बॅनरच्या माध्यमातून भावपूर्ण श्रद्धाजंली अर्पण केली. याप्रसंगी मोठ्या दुखद:अंतकरणाने माजी आमदार राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली की, झालेल्या या दुखद : निधनाने "विकासाचे राजकारण करणारे नेतृत्व हरपले, अजित दादा नसण्याची उणीव राष्ट्रवादी पक्षासह,महाराष्ट्र राज्याला भासणार, प्रशासनात आपल्या कामाचा पगडा असलेला शिस्त, आणि आपल्या कार्यचा ठसा असणारा लोकनेता पुन्हा होणे नाही असे शिंदे यांनी सांगितले.

या घटनेने कल्याणातील त्यांचा चाहतावर्ग पाहता, सर्वसामान्य तळागाळातील कार्यकार्त्यांपासून अबाल वृद्धांपासून समाजातील सर्वच स्तरातील वर्गात एकच दुखद:हळहळ व्यक्त होत असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत होते. या घटनेच्या पार्श्वभूमीवर आंबिवली, अटाळी, मोहने परिसरात दुकाने, ठेलेवाले यांना बंदचे आव्हान करण्यात आले. व्यापारी वर्गासह, ठेलेवाले, फेरीवाले यांनी प्रतिसाद देत दुकाने बंद करून भावपूर्ण श्रद्धांजली दिली. या प्रसंगी शिवसेना उपशहरप्रमुख संघटक विलास रंदवे, सदानंद जाधव,कुणाल पाटील, योगेश पगारे, प्रभाकर महाडिक, पंकज पाटील, तुषार कंदेकर, विशाल भोईर आदी सहभागी झाले होते. तर शिवसेना माजी नगरसेवक दुर्योधन पाटील, युवासेना उपशहरप्रमुख वैभव पाटील व शिवसेना शाखा वडवली-अटाळी-आंबिवली व आंबिवली व्यापारी संघटना यांच्या तर्फे दुकाने बंद ठेऊन अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या बंदमध्ये डॉक्टर, मेडीकल स्टोर यांना वगळण्यात आले होते.

त्याचप्रमाणे यांना मोहोने विभागात दुकाने, रिक्षा व इतर व्यवसाय बंद ठेवण्यात आली होती. महाराष्ट्र राज्यातील तडफदार नेतृत्व, कार्यकर्त्यांचे पाठीराखा, प्रशासनावर जबरदस्त पकड असलेले नेते अजित पवार यांचे विमान अपघात होऊन निधन झाले हि मन सुन्न करणारी घटना असून अजित पवार यांच्या जाण्याने केवळ राष्ट्रवादी पक्षाचेच नाहीतर सर्व सामान्य माणसांवर. मोठा आघात झाला. राजकीय सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते तथा माजी नगरसेवक जे. सी. कटारिया यांनी दिली. यावेळी या बंद मध्ये जे. सी. कटारिया, मुकुंद कोट, सुरेश सोनार, विजय काटकर, जयेश पाटील, रमेश कोणकर, दया शेट्टी, विष्णू वाघमारे, नामदेव लोखंडे, संजय वाघमारे फुलोरे, रमेश रोकडे, सचिन पाटील व इतर सर्व पक्षीय कार्यकर्ते यांनी संपूर्ण मोहोने परिसरात फिरून शांततेने सहभागी होण्यासाठी विनंती केली.


**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कल्याण**
**ता. कल्याण यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

**प्रति,**
**श्री. संतोष मुरलीधर भरणुके**
**रा. मु. पो. मामणोली,**
**ता. कल्याण जि.ठाणे. .................................................... अर्जदार**

**विरुध्द**

**ग्राम पंचायत, मामणोली**
**निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग,**
**ता. कल्याण जि. ठाणे ............................................... सामनेवाला**

**तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे**
**सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे**

उपरोक्त अर्जदार यांची आजी कै. जानकीबाई नारायण भरणुके यांचा मृत्यु दिनांक ०४/०१/१९९७ रोजी त्यांचे राहते घरी ता. कल्याण, जि.ठाणे येथे झालेला आहे.

अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर मृत्युची नोंद मृत्यु नोंदणी विभाग, महानगरपालिका कल्याण डोंबिवली निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, कल्याण दफ्तरी करुन मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी यांची आजी कै. जानकीबाई नारायण भरणुके यांच्या मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.

उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि. ०१/१२/२०२५ दाखल केला आहे.

सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे यांची आजी कै. जानकीबाई नारायण भरणुके यांचा मृत्यु नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे २८/०१/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/-**
**(विकास गारुडकर)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कल्याण**

जा.क्र. फौजदारी/ जन्म मृत्यु नोंद /टि-०६/काVि- ७६०/२०२५ दि.२८/१ /२०२६


# मला एजन्सींवर विश्वास नाही! सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास झाला पाहिजे - ममता बॅनर्जी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २८**

**पुणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दुर्दैवी विमान अपघातात मृत्यू झाला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामती येथे येत असताना हा दुर्दैवी प्रसंग घडला. नवी दिल्लीमध्ये असलेल्या शरद पवारांनी थेट बारामतीसाठी मार्ग धरला आणि हेलिकॉप्टरमधून उतरताच त्यांनी अपघाताबाबत माहिती घेतली. बारामती विमानतळावर पोहोचल्यावर, त्यांनी तिथे उपस्थित असलेल्या नागरिकांकडून आणि अपघाताच्या ठिकाणी तैनात कर्मचाऱ्यांकडून तपशीलवार माहिती जाणून घेतली.

शरद पवारांनी विचारले की, “अजित पवारांचे विमान कसे आणि कुठे कोसळले?” त्यावर स्थानिकांनी सांगितले की, रनवे संपण्यापूर्वी सुमारे एक किलोमीटर अंतरावर विमान अपघातग्रस्त झाले. अपघाताचे ठिकाण रनवेच्या बाजूला खोलगट भागात होते. अजित पवारांच्या अकाली जाण्यामुळे पवार कुटुंबीयांना असणारे दुःख अतिशय मोठे आहे. या प्रसंगात सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांचे अश्रूही दिसून आले.

अजित पवार हे राज्यातील कुशल, जनहितासाठी समर्पित आणि अनुभवी नेतृत्वाचे प्रतिनिधी होते. त्यांच्या अकाली जाण्यामुळे राजकीय आणि सामाजिक जीवनात अपूरणीय नुकसान झाले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. ते मुंबईहून बारामतीला एका खासगी विमानाने प्रवास करत होते. हे विमान VT-SSK नोंदणी क्रमांक असलेले बॉम्बार्डियर लिअरजेट 45 मॉडेलचे होते. दरम्यान, अजित पवारांच्या विमान अपघातानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी संशय व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीत चौकशीची मागणी केली आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिल्ली दौरा रद्द केला. ममता म्हणाल्या, कोणीही सुरक्षित नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली योग्य चौकशी झाली पाहिजे. हे विनाकारण भीती पसरवणारे आहे की कट आहे, हे काळच सांगेल. तथापि, सर्वात सोपा मार्ग म्हणजे पायलटला दोष देणे, जसे आपण मागील दोन प्रकरणांमध्ये पाहिले आहे.

### ममता नेमकं काय म्हणाल्या?

**जर एखाद्या वरिष्ठ राजकीय नेत्यासोबत अशी घटना घडू शकते, तर ती आपल्या व्यव्थे च्या सुरक्षेबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित करते. मी असे अहवाल पाहिले की ते एनडीएमध्ये असताना त्यांच्या राजकीय स्थानाचा विचार करत होते. अशा परिस्थितीत, या घटना खूप चिंताजनक आहेत. मला इतर एजन्सींवर विश्वास नाही. त्या पूर्णपणे तडजोड केलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास झाला पाहिजे.**

**'पायलटला धावपट्टी दिसली नाही'**

**दरम्यान, VSR व्हेंचर्स, ज्या कंपनीचे अजित पवार विमानातून उड्डाण करत होते, त्यांनी एक निवेदन जारी केले आहे की, "पायलट धावपट्टी पाहू शकला नाही. त्याला अंदाजे 16 हजार तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. सह-वैमानिकाला अंदाजे 1500 तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. विमानात कोणताही तांत्रिक दोष नव्हता. एअरलाइनकडे अजूनही सात विमाने आहेत. आम्ही ती ग्राउंड करत नाही आहोत. DGCA आमच्या विमानाची चौकशी करत आहे."**




- पुणे-बारामती परिसरात दाट धुके, दृश्यमानता अत्यंत कमी होती.
- बारामतीचे विमानतळ लहान आहे आणि त्याच्याकडे ILS (Instrument Landing System) सुविधा नाही.
- त्यामुळे पायलटला मॅन्युअल लँडिंग करावी लागली.
- विमानाने रनवेवर थेट प्रवेश केला नाही, तर मोठा वळसा घेतला.
- याचा अर्थ पहिला लँडिंग प्रयत्न रद्द (aborted) केला गेला.
- धुक्यात रनवेवर (align) करणे कठीण झाले.
- दुसरा लँडिंग प्रयत्न केला गेला.
- याचवेळी पायलटने MAYDAY कॉल जारी केला.
- DGCAच्या सूत्रांनुसार, हे टेबल-टॉप रनवे आहे.
- लँडिंगदरम्यान विमान रनवेच्या कडेला कोसळले.
- सुमारे 100 फूट उंचीवर विमानाचा तोल गेला.
- रनवेपर्यंत पोहोचण्याआधीच विमान जमिनीवर आदळले.
- विमान जमीनीवर आदळल्यावर मोठा स्फोट झाला, त्यानंतर अनेक लहान स्फोट झाले.
- त्यानंतर विमानात भीषण आग लागली.
- आगीमुळे तात्काळ बचावकार्य शक्य झाले नाही.
- अपघाताचा तपास चालू आहे,
- DGCA अहवालानंतर अंतिम कारण निश्चित होईल.

# दादांच्या निधनाने भिवंडी शहरात हळहळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● प्रतिनिधी / दि. २८

भिवंडी ( प्रतिनिधी ) महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज सकाळी विमान अपघातात निधन झाल्याची बातमी येताच सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले की राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्र एका धाडसी नेतृत्वाला मुकला.सर्वसामान्य दीन-दुबळयांचे दु:ख समजणारा नेता आज आपल्यात राहिलेले नाहीत. देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासामध्ये दादांचे मोलाचे योगदान होते. त्यांचे `दादा' हे नाव वडिलकीच्या नात्याने प्रचलित झाले. पण खऱ्या अर्थाने त्यांनी विकासाचे `दादा' बनून नाव सार्थ ठरविले. अजितदादा पवार यांच्या अपघाताच्या निधनाने पवार कुटुंबियांचीच नव्हे तर, महाराष्ट्राची न भरून येणारी हानी झाली आहे. महाराष्ट्राच्या विकासाचे एक `चाक' निखळले.असा नेता पुन्हा होणे नाही.अशी भावपूर्ण श्रद्धांजली कपिल पाटील यांनी आपल्या शोक संदेशात व्यक्त केली आहे.

# 'दादा परत या...!

## बारामतीकरांचा काळीज पिळवटून टाकणारा टाहो

महाराष्ट्राचे वित्त मंत्री, बीड आणि पुण्याचे पालकमंत्री, तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज 28 जानेवारी 2026 रोजी विमान अपघातात अखेरचा श्वास घेतला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीकडे येत असताना पुणे–बारामती परिसरात त्यांच्या विमानाला अपघात झाल्याची माहिती समोर आली. या घटनेत ते गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जात असून, त्यानंतर त्यांच्या निधनाची बातमी पसरल्याने राज्यभर शोककळा पसरली आहे.

यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पार्थिव दुपारी बारामती रुग्णालयातुन हलवले असून अजित पवार यांचे पार्थिव ठेवण्यासाठी काचेची पेटी रूग्णालयात आणण्यात आली. अजित पवारांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानमध्ये हलवण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पार्थिव बारामतीमधील विद्या प्रतिष्ठान या ठिकाणी रात्री 10 वाजेपर्यंत अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आलं आहे. अजित पवारांच्या अंतिम दर्शासाठी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे.

# दादांनी अखेरचा प्रवास केलं ते विमान नेमकं कसं होतं?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / दि. २८**

अजित पवार ज्या विमानातून प्रवास करत होते, त्या 'लिअरजेट-45' बाबत मोठी चर्चा सुरू आहे. डीजीसीएने दिलेल्या माहितीनुसार, हे एक मध्यम आकाराचे व्यावसायिक 'सुपर लाईट' जेट विमान आहे. कॅनडातील 'बम्बार्डियर एरोस्पेस' या नामांकित कंपनीने या विमानाचे उत्पादन केले असून, हे विमान प्रामुख्याने तातडीचे दौरे आणि व्यावसायिक प्रवासासाठी वापरले जाते. अजित पवारांचे हे विमान 16 वर्षे जुने होते आणि त्याचा टेल नंबर VT-SSK असा होता.

लिअरजेट-45 हे विमान त्याच्या वेगासाठी आणि छोट्या धावपट्ट्यांवर लँडिंग करण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जाते. या विमानाचा वेग ताशी 800 ते 850 किमी इतका असून ते एका दमात तब्बल 3000 किमीपर्यंतचा प्रवास करू शकते. विमानाची लांबी 58 फूट आणि उंची 14 फूट असून, ते 51000 फूट उंचीवरून उड्डाण करण्यास सक्षम आहे. साधारणपणे 6 ते 8 प्रवाशांची आसनक्षमता असलेल्या या विमानात सुरक्षित प्रवासासाठी दोन इंजिन आणि अत्याधुनिक यंत्रणा असते.

विमानात फ्रेश होण्यासाठी एक बाथरूम किंवा स्वच्छतागृहाची सोय असते. प्रवासाची वेळ वाचवण्यात हे विमान मदत करते, त्यामुळे व्यावसायिक किंवा राजकारणी या विमानाला प्रवासासाठी प्राधान्य देतात. अजित पवारांचे हे चार्टर विमान 'व्हीएसआर व्हेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड' या दिल्लीस्थित कंपनीच्या मालकीचे होते. उद्योगपती व्ही. के. सिंह यांनी ही कंपनी स्थापन केली असून, ती खासगी जेट लीजिंग, हवाई रुग्णवाहिका आणि चार्टर सेवा पुरवते.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
**सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा** मुंबई विद्यापीठाशी संलग्न

**ADMISSION OPEN 2025-26**



Look forward to a **BRIGHTER FUTURE**

**११ वी व १२ वी**
**ARTS, COMMERCE, SCIENCE**

UNDER GRADUATE: B.A. / B.Com. / B.Sc. CHEMISTRY / B.Sc. MATHS / BAF / BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY / M.Com. ADVANCED ACCOUNTANCY / M.A. MARATHI / M.A. ECONOMICS / M.A. SOCIOLOGY / M.A. HISTORY

**7038658191**
**9130580111**



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
पाणी पुरवठा विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या इंदिरानगर संप व पंप हाऊस येथील दुरुस्ती करणे करणे कामी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदाराविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदनी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे. अशा कंत्राटदाराना निविदा प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्रे ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर दि.२९/०१/२०२६ रोजी दुपारी १६.०० पासून दि.०५/०२/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. दि.०५/०२/२०२६ रोजी पर्यंत सांय. १६.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि.०५/०२/२०२६ रोजी सांय. १७.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु/१११४/२०२५-२६ — सही/-
दि:२८.०१.२०२६ — कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site — ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**



ठाणे ■ गुरुवार
२९ जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता




# विद्यार्थी वाहतूक वाहनांची तातडीने तपासणी करण्याचे आदेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** बदलापूरमध्ये नुकत्याच घडलेल्या लैंगिक अत्याचार घटनेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवरही विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या व खासगी रिक्षा यांची नियमित तपासणी व्हावी असे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विद्यार्थी सेनेने शहरातील चारही पोलिस ठाण्यांना दिले आहे.बदलापूर येथील शाळेच्या व्हॅनमध्ये चार वर्षीय चिमुकलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेमुळे पुन्हा एकदा संतापाची लाट उसळली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. बदलापुरात घडलेल्या या घटनेच्या पार्श्वभूमीवर डोंबिवलीतील शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची आणि चालकांची नियमित तपासणी व्हावी असे निवेदन मनविसेने दिले आहे.शहरातील मानपाडा, रामनगर, विष्णूनगर, टिळकनगर पोलिस ठाण्यांसह शहर वाहतूक शाखेला मनविसेच्या शिष्टमंडळाने भेट देऊन तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवादही साधला.यावेळी मनसेचे विद्यार्थी सेनेचे डोंबिवली शहराध्यक्ष प्रतीक देशपांडे, उपशहर अध्यक्ष यतीन पाडगावकर यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांना राष्ट्रपती पुरस्कार

## शेतकऱ्याचा मुलगा ते राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त IPS अधिकारी

## पुरुषोत्तम कराड यांची प्रेरणादायी यशोगाथा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शेवगाव तालुक्यातील ढोरजळगाव या छोट्याशा गावातून पुढे येत देशाच्या सर्वोच्च सन्मानापर्यंत पोहोचणारी यशोगाथा म्हणजे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम नारायण कराड (IPS) यांची वाटचाल. सध्या मुंबई सायबर क्राइम विभागात पोलीस उपायुक्त म्हणून कार्यरत असलेल्या कराड यांना गुणवत्तापूर्ण सेवा, कर्तव्यनिष्ठा आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रपती पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी प्रजासत्ताक दिनी पुरुषोत्तम कराड यांचे अभिनंदन केले. हा मानाचा पुरस्कार नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात येणार आहे.

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या पुरुषोत्तम कराड यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि जिद्दीच्या बळावर लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली. सन २००२ मध्ये पोलीस उपअधीक्षक (DSP) म्हणून त्यांनी सेवेत प्रवेश केला. त्यानंतर राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये त्यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी बजावली. गुन्हेगारी नियंत्रण, नागरिकांशी थेट संवाद, तक्रार निवारण, महिला व बाल सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या काळातील त्यांची तत्परता विशेष प्रशंसनीय ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक संवेदनशील व गुंतागुंतीच्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास झाला असून त्यामुळे पोलीस प्रशासनावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि जनसामान्यांशी आपुलकीने वागणारे अधिकारी म्हणून पुरुषोत्तम कराड यांची ओळख आहे. त्यांच्या या निस्वार्थ सेवाभावाची दखल घेत केंद्र सरकारने त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. या गौरवामुळे शेवगाव तालुका, ढोरजळगाव गावासह संपूर्ण अहिल्यानगर, ठाणे, मुंबई जिल्ह्यात आनंदाचे वातावरण पसरले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातून येऊनही उच्च पदापर्यंत पोहोचता येते, हे सिद्ध करत पुरुषोत्तम कराड यांनी आजच्या तरुण पिढीसमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे.

# रक्तदान शिबीरातून संकलित केल्या ५७ बाटल्या



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** आदिवासी एकता मित्र मंडळ व शिवध्येय अकॅडमी यांच्या वतीने आयोजित तसेच कच्छ युवक संघ यांच्या सहकार्याने बिरसायत भवन, मनोर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश खांडेकर यांचा हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर कच्छ युवक संघ, पालघर यांच्या सहकार्याने व रक्तपेढी माध्यमातून आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात एकूण 57 बाटल्या रक्त संकलित करण्यात आल्या असल्याचे एकता मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोषजी जनाठे यांनी म्हटले आहे.

या कार्यक्रमावेळी विविध राजकीय, सामाजिक पदाधिकारी कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते. तर या कार्यक्रम यशस्वीतेसाठी आदिवासी एकता मित्र मंडळ, शिवध्येय अकॅडमी व कच्छ युवक संघाचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले होते.

# कै. विठ्ठल गोविंद भेरे प्रतिष्ठानच्या वतीने मोफत अभ्यासिकेचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** वासिंद येथील कै. विठ्ठल गोविंद भेरे प्रतिष्ठानच्या वतीने मोफत अभ्यासिकेचे उद्घाटन करण्यात आले.

वासिंद व परिसर या ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय व स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविंद्र भेरे, उपाध्यक्ष राजेंद्र भेरे यांच्या वतीने ही अभ्यासिका सुरू करण्यात आली असून सदर अभ्यासिकेचे उद्घाटन जेएसडब्लू कंपनी जनसंपर्क अधिकारी चिन्मय पालेकर, प्राध्यापक डॉ. दिलीप चौधरी, डॉ.भरत तारमळे, सरपंच राजेंद्र म्हसकर, सुनील सदगीर, स्व. विठ्ठल भेरे यांच्या पत्नी मिनाक्षी भेरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या अभ्यासिकामध्ये मुलींसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, ग्रुपस्टडी व जेवणासाठी स्वतंत्र केबिन व्यवस्था, वर्तमानपत्र सुविधा, स्पर्धा परीक्षा पुस्तके उपलब्ध व तज्ञांकडून मार्गदर्शन तसेच सीसीटीव्ही नियंत्रण सुविधा उपलब्ध असणार आहेत. तर यावेळी काही उपस्थित मान्यवरांनी प्रतिष्ठानसाठी पुस्तके भेट दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत भेरे, सूत्रसंचालन संजीव जाधव यांनी केले. तर यासाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले होते.

# पडघ्यातील दिव्यांगांना 5 टक्के निधीतून धनादेशाचे मान्यवरांच्या हस्ते वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील दिव्यांगांना ग्रामपंचायतीच्या ५ टक्के राखीव निधीतून उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते धनादेशाचे उत्साहात वाटप करण्यात आले.

२६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत प्रांगणात सरपंच सायली पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर पडघ्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीच्या ५ टक्के राखीव निधीतून नीधी वाटपाचा कार्यक्रम सोमवारी ग्रामपंचायत सभागृहात घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे उपस्थीत होते. त्यांच्या शुभहस्ते ३८





लाभार्थ्यांना प्रत्येकी १३ हजार ५०० रुपयाच्यां धनादेशाचे वाटप करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत फंडातुन ग्रामपंचायत कार्यालय व जिल्हा परिषद शाळा येथे बसवण्यात आलेल्या सोलर पॉवर सिस्टीम, पंचशील नगरमध्ये टाकलेली नवीन पाईपलाईन, बालाजी नगर गटार दुरूस्ती, दीनदयाळ नगर येथील गटार बांधकामाचे व गणेश नगर येथे बनविण्यात आलेल्या सिमेंट क्रॉंक्रीट रस्ता या विकासकामांचा लोकार्पण सोहळा उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते पार पडला. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत कमीटी यांना जो काळ उपभोगायला मिळाला आहे त्या संधीचे सोने करून विकासकामांचा लाभ, सुवीधा शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवल्या पाहीजे. तसेच पडघा ग्रामपंचायत करीत असलेल्या विकासकामांबाबत सरपंच सायली पाटील, उपसरपंच चंदा साळुंके, ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे ग्रामपंचायत कमीटी यांचे शिवसेना नेते प्रकाश पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात कौतुक करून स्वातंत्र्य सैनीकांच्या त्यागामुळे, बलीदानामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असुन त्यांची आठवण ठेऊन त्यांना नमन केले पाहिजे असे पाटील यांनी सांगितले यावेळी ग्रामपंचायत सदस्य रविंद्र विशे,अभिषेक नागावेकर, मयूरेश गंधे, नसीर शेख, प्रभावती जाधव, वृषाली खिसमतराव, नयना जाधव, निता दास माजी सरपंच संजय जाधव, शंशाक तांबोळी,व्यापारी मंडळाचे अध्यक्ष दिनेश गंधे, ग्रामपंचायत कर्मचारी नागरीक उपस्थीत होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# मुंबई विद्यापीठ उडान महोत्सवात म्हसा महाविद्यालयाची चमकदार कामगिरी





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे उदिष्ट विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करणे, व्यक्तिमत्त्व विकास करणे आणि प्रत्यक्ष कामातून (Extension Work) शिकण्याची संधी देणे हे आहे, तर या विभागाद्वारे दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये 'उडान-विस्तार कार्याची गरुडझेप' या वार्षिक महोत्सवाचे आयोजन केले जाते. मुंबई विद्यापीठाचा आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग (DLLE) आणि साकेत महाविद्यालय कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने उडान २०२५-२६ महोत्सवाचे आयोजन दि. २७ जानेवारी २०२६ रोजी साकेत महाविद्यालय कल्याण येथे करण्यात आले. या महोत्सवात ३४ महाविद्यालयांनी विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला. यामध्ये पोवाडा, पथनाट्य, वक्तृत्व, सृजनशील लेखन, पोस्टर मेकिंग अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात आपल्या महाविद्यालयातील DLLE विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य, पोस्टर मेकिंग, वक्तृत्व व सृजनशील लेखन या स्पर्धेत सहभागी झाले होते त्यापैकी वक्तृत्व स्पर्धेत कु. रोहिणी चौधरी ह्या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक प्राप्त केले. या वेळी विद्यार्थ्यांसोबत DLLE विभागातील प्रा. विशाखा पवार मॅम आणि प्रा. विजय सोनार सर उपस्थित होते. या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केलं व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अखंड हरिनाम सप्ताह कार्यालयाचे उद्घाटन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) :** वासिंद येथील अखंड हरिनाम सप्ताह समिती आयोजित अखंड हरिनाम सप्ताह कार्यालयाचे उद्घाटन प्रजासत्ताक दिनी करण्यात आले.

सालाबादप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह समिती वासिंद व परिसर या सप्ताह समितीच्या वतीने अखंड हरिनाम सोहळा दि. 19 ते 25 मार्च 2026 या कालावधीत संपन्न होणार आहे. सदर या सप्ताह कार्यालयाचे उद्घाटन उद्योजक संजय गुजरे व माऊलींच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ कार्यकर्ते रंगनाथ काठोळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी सप्ताह समिती अध्यक्ष सुनील (बाळा) सोगळे, उपाध्यक्ष पंडित शेलार, सचिव संजय पाटील, खजिनदार भगवान बेलवले, सहसचिव शांताराम ससाणे, उपाध्यक्ष काळूराम पवार, बाळा गौरु शेलार, सहखजिदार आत्माराम काठोळे आदी अखंड हरिनाम सप्ताह समिती पदाधिकारी, सदस्य तसेच राजकीय, सामाजिक, पदाधिकारी व वारकरी संप्रदाय मंडळी उपस्थित होते.

# शासनमान्य ग्रंथ निवड यादीमध्ये समावेश करण्यासाठी ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांसाठी 'ग्रंथभेट' योजनेअंतर्गत सन २०२५ मध्ये प्रकाशित मराठी, हिंदी व इंग्रजी ग्रंथ पाठविण्याची अंतिम मुदत २८ फेब्रुवारी २०२६ आहे. या योजनेअंतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडे प्रत्येक ग्रंथाची प्रत सादर करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रथम आवृत्ती असलेले ग्रंथ समाविष्ट असावेत. वेळेत पाठवले नसलेले ग्रंथ निवड यादीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. ग्रंथ पाठवताना राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, विभागीय ग्रंथालय पुणे आणि विभागीय ग्रंथालय नागपूर येथे प्रत पाठवावी व पोहोच पावती घेऊन संचालनालयास टपाल किंवा समक्ष पाठवावी. लेखक व प्रकाशकांनी वेळेत ग्रंथ पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# क्रांतिज्योती विद्यालय सिनेमा करमुक्त करावा

## - शिक्षण क्रांती संघटनेची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या उद्दिष्टांनुसार अभ्यासक्रमातील अवघड संकल्पना लवकर समजण्यासाठी प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतुन किंवा स्थानिक समुदायात बोलल्या जाणा-या भाषेतुन होणे गरजेचे आहे. सध्या गाजत असलेला क्रांतिज्योती विद्यालय हा चित्रपट देखील हाच संदेश देत आहे. यासाठी हा सिनेमा अधिकाधीक घरांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. हा चित्रपट करमुक्त केल्यास जास्तीत जास्त लोकांपर्यंत तो पोहोचेल व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होईल. याबाबतचे निवेदन शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने ठाणे जिल्हाधिका-यांच्या मार्फत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना देण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी संदिप माने, क्रांतिज्योती विद्यालयाचे दिग्दर्शक हेमंत ढोमे,निर्माती क्षिती जोग, अभिनेते अमेय वाघ, हरेश दुधाळे, शिक्षण क्रांती संघटनेचे राज्याध्यक्ष सुधीर घागस, कोकण विभाग कार्यवाह ज्ञानेश्वर गोसावी, उल्हासनगर महानगर अध्यक्ष राजेंद्र गवळी, ठाणे महानगर अध्यक्ष किशोर राठोड हे उपस्थित होते.

मातृभाषेतुन शिक्षण घेणा-या मुलांना शैक्षणिक संकल्पना दृढ झालेल्या असतात त्यामुळे उच्च शिक्षण घेताना त्यांना अध्ययनात अडचणी येत नाही व पुढील शिक्षण सहज होते. परंतु इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेतल्यास मुलं हुषार होतात असा गैरसमज पालकांच्या मनात झालेला आहे. क्रांतिज्योती विद्यालय चित्रपट पाहिल्यास हा गैरसमज दुर होऊन मातृभाषेतील शिक्षणाचे महत्व पालकांच्या लक्षात येईल असा विश्वास सुधीर घागस यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याजवळ व्यक्त केला. चित्रपट करमुक्त करण्यासाठी शासनाकडे शिफारस करणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पाचांळ यांनी चित्रपटाची टीम व शिक्षण क्रांती संघटनेचे पदाधिकारी यांना सांगितले.

# मुरबाड शहरातील बाजारपेठ बंद ठेऊन अजितदादांना वाहिली श्रद्धांजली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(दिलीप पवार) :**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री, महाराष्ट्राच्या राजकारणातील परखड, स्पष्टवक्ता व प्रचंड प्रशासकीय अनुभव पाठीशी असणारा धुरंधर नेता अजिदादा पवारांचे मुंबईहून बारामती येथे विमानाने जात असताना बारामती येथे विमानाचा अपघात होऊन अजितदादा पवार व त्यांच्या सोबतचे चार सहकारी व वैमानिक यांचा दुर्दवी मुत्यूची बातमी समजताच संपुर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. विमान खाली कोसळताच विमानाने पेट घेतला व एका क्षणात होत्याचे नव्हते झाले. एका हुशार,अभ्यासू आणी दुरदृष्टी असलेल्या नेत्याला महाराष्ट्र मुकला अशाच भावना प्रत्येकाच्या तोंडून निघत होत्या.

आज मुरबाड तालुक्यात व शहरातही अजित दादांच्या निधनाची वार्ता समजताच सर्वत्र एकच चर्चा होत होती असा नेता पुन्हा होणे नाही. मुरबाड शहरात राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांना अश्रू अनावर होत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली तर बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवून दादांना श्रद्धांजली वाहिली.

असा हा परखड, निर्भिड, स्वच्छ मनाचा लोकप्रिय राजकारणी हरपल्याने संपुर्ण महाराष्ट्रावर आज शोककला पसरली आहे.

# आंबेडकरी चळवळीतील स्वाभिमानी व डॅशिंग नेतृत्व बाळासाहेब भोईर यांचे निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबाडी :** ठाणे जिल्ह्यातील मौजे- आंबिवली येथील कायमचे रहिवासी असणारे आंबेडकरी चळवळीतील स्वाभिमनी,डॅशिंग,तसेच आपल्या तत्त्वांशी कुठेही आणि कधीही तडजोड न करणारे नेतृत्व बाळासाहेब भोईर यांचे आजारपणामुळे सोमवार दिनांक- 26/02/2026 रोजी त्यांचे वयाच्या 73 व्या वर्षी दुःखद असे निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, 4 मुली,1मुलगा व नातवंड असा परिवार आहे.दिवंगत- बाळासाहेब भोईर हे मोहने येथील एन्.आर.सी. कंपनीत नोकरीस असतानाही त्यांना सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची अत्यंत आवड असल्यामुळेच ते ज्या-ज्या ठिकाणी सामाजिक अन्याय,अत्याचाराच्या घटना घडायच्या त्या ठिकाणी ते खंबीरपणे आपले योगदान देऊन,अन्यायग्रस्तांना मदत करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.त्यामुळेच त्यांच्या या आक्रमक भूमिकेतून त्याने "मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात " सक्रीय सहभाग घेतल्याने त्यांना काही दिवस तुरूंगवास भोगाला लागला,त्यांच्यासोबत आंदोलनकर्ते सहकारी बाळासाहेब भालेराव, दिवंगत- हरेश दोंदे आदिंचाही सहभाग होता.

विशेषतः दिवंगत- बाळासाहेब भोईर हे ठाणे जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील डॅशिंग पॅन्थर नेतृत्व समाजात आदर्श,निःस्वार्थी, आणि आयुष्यात कधीही आपल्या विचारांशी तडजोड न करणारे असल्यामुळेच समाजात त्यांना खुपमोठा मानसन्मान होता.त्याने आंबेडकरी चळवळीत कार्य कलताना ठाणे जिल्हा " दलित पॅन्थर अध्यक्ष " " रिपाई कोकण प्रदेश अध्यक्ष " ठाणे जिल्हा बौद्ध संघ" आदि ठिकाणी त्यांनी आपल्या कामाचा विशिष्ट असा ठसा उमटवून आपली समाजाप्रती सेवा केली आहे. त्यामुळेच त्यांच्या अंत्यसंस्कारास समाजातील मान्यवर मंडळींपैकी शामदादा गायकवाड (रिपाई सेक्युलर रा.अध्यक्ष) सुरेश सावंत (रिपाई रा.उपाध्यक्ष आ.) अण्णासाहेब रोकडे (रिपाई महा.प्र.उपाध्यक्ष आ.) प्राचार्य रमेश जाधव ( जेष्ठ पॅन्थर नेते ) डॉ. वि.सो.शिंदे (जेष्ठ साहित्यिक) प्रा.एकनाथ जाधव (जेष्ठ पॅन्थर नेते) प्रा. शुकाचार्य गायकवाड (जेष्ठ



साहित्यिक) जयवंतराव सोनावणे, (साहित्यिक व जेष्ठ नेते ठा.जिल्हा ) ना.पां.जाधव (सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी) बाळासाहेब भालेराव, ( रिपाई सरचिटणीस आ.ठा.जिल्हा) सुदाम संगारे ( रिपाई जेष्ठ कार्यकर्ते) असे महत्त्वपूर्ण नेते त्याचबरोबर असंख्ये जनसमुदाय उपस्थित राहून आपल्या आवडत्या नेतृत्वाला भावपूर्ण आदरांजली व्यक्त केली.








Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024